REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# ‘सुरवंट’ कादंबरीतून व्यक्त झालेले स्त्री–पुरुष संबंधतील वास्तव

डॉ. संभाजी मलघे
इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, पुणे.

## सारांश–




मराठी ग्रामीण कांदबऱ्यांमधून स्त्री पुरुष संबंधांमधील वास्तवतेचा वेध घेणाऱ्या कादंबऱ्या संख्येने कमी आहेत. पती–पत्नीच्या नात्यांविषयी मोकळेपणाने मांडणाऱ्या कादंबऱ्या मराठी साहित्यात आहेत, मात्र ग्रामीण कादंबऱ्यांमधून पती–पत्नीच्या संबंधांवर मतमतांतरे मांडणाऱ्या कादंबऱ्या मोजक्याच आहेत. त्यातही विशिष्ट जातीमधील स्त्रियांना याविषयी बोलण्याची, मांडण्याची मुभा दिली जात नाही कारण समुहातील स्त्रियांचे जीवन अजुन साहित्याविश्वामध्ये प्रकट झालेले नाही. कारण अजुनहीं स्त्रियांकडे पाहण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन प्रगत नाही परंपरेने काढलेल्या जोखडामध्ये स्त्रियांनी रहावे, जगावे असे मानणारी ही माणसे आहेत.

## प्रस्तावना–

कुटुंबात रहात असताना कौटुंबिक पातळीवरचे पती–पत्नीचे संबंध कसे असतात. याविषयीचे विपूल साहित्य मराठीमध्ये उपलब्ध आहे मात्र ग्रामीण जीवनातील पतीपत्नीमधील संबंधांविषयी ग्रामीण स्त्री लेखिका धिटाईने लिखाण करत नाहीत हे वास्तव स्वीकारले तर या मर्यादा, हे वास्तव ओलांडून असे लिखाण करणाऱ्या ग्रामीण स्त्री लेखिकांच्या लेखनाचे स्वागत होणे साहजिक आहे ‘सुरवंट’ या कादंबरीमधून अर्चना डावखर–शिंदे या नव्या दमाच्या लेखिकेने हे आव्हान पेललेले दिसते.

## सुरवंट कादंबरीमधून व्यक्त झालेले स्त्री–पुरुष संबंधातील वास्तव आणि स्त्री विषयक धारणा :

‘मनातलं गुज’ या मनोगतामध्ये अर्चना डावखर–शिंदे म्हणतात, ‘‘चंदाच्या प्रतिभेचे नानाविध उन्मेष ‘सुरवंट’ मधून भरघोस प्रमाणात प्रकट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. समाजातील तळागाळातील उपेक्षित वंचित महिलांचे प्रतिनिधित्व नायिकेच्या रूपात (चंदा) मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अनुभवलेल्या दुःखांनी आपल्या अस्मितेचे भान ठेवून प्रखर जाणिवेला स्वतः साहित्य रुपाने वाट मोकळी करुन दिली आहे. लिंगभावाधिष्ठित विषमता आणि पितृसत्ताक पुरुषप्रधान व्यवस्थेला मोठया धैर्याने तोंड देऊन स्त्रियांवर होत असलेल्या अन्यायाला, अत्याचाराला चंदाच्या माध्यमातून एक चपराक आहे.’’[1] ही चपकार देताना परंपरेने काढलेल्या कोणकोणत्या गोष्टी सुरवंटच्या नायिकेला चारूला सहन कराव्या लागल्या याची ओळख कादंबरी लेखिकेने करून दिली आहे. कोवळ्या वयाची चंदा स्वप्नामध्ये रमणारी आहे. अल्लड अवखळ आहे. तिला आपल्या शरीर अवयवाची पुरेशी ओळख नाही. ती नटणरी आहे, स्वच्छंदी आहे. मात्र अशा स्वप्निल मुलीला आयुष्याचा जोडीदार लाभलाय तो मात्र विजोड, अवगुणी आणि संवेदनाहीत. या जोडीदाराचे वर्णन करताना चंदा म्हणते– ‘‘चंदा नुकतीच कळीतून फूल झालेली कोवळी पोर अन् तारुण्य ओलांडून सगळे उपभोग घेतलेला, तो निवार चेहऱ्याचा भीती वाटावी असा उंचापुरा दुहेरी हाडाचा, चाळीशी ओलांडलेला रांगडा पुरुष, की ज्याचे शरीर मन सारे काही तृप्त झालेले.’’[2] उपेक्षित समाजातील स्त्रियांना कशी वागणूक दिली जाते हे या कादंबरीत मांडले आहे. स्त्री आणि पुरुष

यांच्यामध्ये पती–पत्नी म्हणून उत्तम सहजीवनासाठी, नैसर्गिक दृष्टीने विचार करता वयाचे किती अंतर असावे? याविषयी पारंपरिक दृष्टिकोन यामधून व्यक्त झाला आहे. इथे वयाचा विचार नाही, माणूस म्हणून गृहित धरलेल्या संवेदनशीलतेचाही विचार नाही. या स्त्रिया म्हणजे उपभोगाच्या वस्तू, काम करणारी जिवंत यंत्र, भावना व्यक्त न करता जगणारी पत्नी, आईची कर्तव्ये एकटीने पार पाडणारी आई आणि त्या घरातील रितीरीवाजांचे, नियमांचे पालन करणारी घरंदाज करणारी पुढची पौढ स्त्री यापेक्षा वेगळी रूपे या लोकांना माहीत नाहीत. ती माहीत करून घेण्याची गरजही त्यांना वाटत नाही. हे वास्तव ही कादंबरी स्पष्टपणे मांडते. ''कादंबरी या वाङ्मयप्रकाराकडून आपण नेहमीच वास्तव जीवनदर्शनाची अपेक्षा बाळगत आलो आहोत. लेखक कोणत्याही दर्शनबिंदूतून कथन करीत असो, त्याने जीवनसत्यांचाच आविष्कार केला पाहिजे. अशी अपेक्षावाचक बाळगत असतो. परंतु त्यासाठी तो विशिष्ट अनुभव आधी कादंबरीत स्वरूप व्हावा लागतो. अशाप्रकारे कादंबरीतील जीवनचित्रणाला कलारूप प्राप्त होणे आवश्यक असते.''[3] 'सुरवंट' या कादंबरीमधून असे अनुभव स्वरूप झाले आहेत. ते अनुभव वास्तव आहेत. या व्यक्त झालेल्या अनुभवातून स्त्री–पुरुष संबंधांमधील वेगवेगळे कंगोरे दाखवून दिले आहेत. म्हणून जीवनाच्या एका अंगाचे वास्तवपूर्ण दर्शन या कादंबरीतून होते.

पाटील देशमुखांच्या घरातील स्त्रियांनी कसे वागावे? कसे वागवावे? याविषयीचे काटेकोर पाळायचे दंडक अर्चना शिंदे यांनी मांडले आहेत. सरंजामी वृत्तीच्या माणसांनी भरलेल्या घरात स्त्रियांचे स्थान नेमके कोणते? आणि कसे? याची उत्तरे जागोजागी मिळत राहतात. ''देशमुखांचं घर, घरातली माणसं जेवल्याशिवाय सुनेने जेवायला हसायचे नाही, हा त्यांचा रिवाज, साऱ्यांची जेवण आटोपल्यावर कितीतरी वेळाने चंदा स्वतःच जेवायला घेते. नवी नवरी पण तिला, 'चंदा, तू जेवून घे' कुणी आपलेपण दाखवत नाही. अन् म्हणायला नवीन सून करून आपली....गडीमाणसांचे तर अंधार झाल्याशिवाय बायकोसमोर येणंसुद्धा, बोलणं सुद्धा वर्ज्य होतं. 'देशमुखांच्या सुना या दिवसभर घरातल्या मोलकरणी अन् रात्रीला अंधाराला शमविणाऱ्या मुक्या बाहुल्या असतात. तर नवऱ्याने तू जेवण केलं काय? हे विचारणं तर लांबचीच गोष्ट होती?''[4] अशाप्रकारच्या मानसिकता जपणाऱ्या माणसांमध्ये नव्या सुनांना आपले जीवन कंठावे लागते. अशाप्रकारच्या शारीरिक, मानसिक छळवादाचा तिला जीवनभर सामना करावा लागतो. विचार न करणारी माणसं. सुनांचा असा छळ का करायचा? या अनुत्तरीत प्रश्नाचा सामना करणाऱ्या सुना, आणि जो आयुष्याच्या सुखःदुखाचा जोडीदार नवरा तो पाषाण–हृदयी. असे जीवन या स्त्रियांच्या वाटयाला येते. चंदा या साऱ्या स्त्रियांची प्रतिनिधी आहे. घरात असलेली टोकरीतली फळ खायची तिला परवानगी नाही. ही परवानगी सासूची घ्यावी लागते. तर भाज्या कशा असाव्यात? यावरून वडिलधाऱ्यांची, सासऱ्याची बोलणी खावी लागतात भाजीत एवढं तेल का टाकलं का? म्हणून ताट फेकून देणारा सासरा किंवा हे जेवण कुत्र्यालाच घाल अशी प्रतिक्रिया देणाऱ्या सासऱ्याच्या स्वभाविषयी, वागण्याच्या पद्धतीविषयी काय बोलावे? असा प्रश्न चंदाला पडलेला दिसतो.

आधुनिकतेने वागणेही इथल्या वडिलधाऱ्या पुरुषांच्यावचनी पडलेले दिसत नाही. आपल्या सुनांविषयी ही जुनी माणसं, जुन्या वळणाची माणसं कुजक्या प्रतिक्रिया देताना दिसतात. चंदाचे सासरे आप्पासाहेब चंदाच्या वागण्याविषयी तिरस्काराने म्हणतात–''चायचा टन्ना! गरिबाघरची केली, ती पण डोक्यावर बसली. पेपर काय वाचतेय. बैठकीत काय जाऊन बसते. केस काय मोकळे सोडतेय. इतं कायबी चालायचं नाही म्हणा!''[5] या उद्‌गारामधून या घरातील पुरुष मंडळीच्या स्त्रियांविषयीच्या धारणा किती विकृत मागास, बिनडोकपणाने भरलेल्या आहेत हे स्पष्ट होते.

## पती पत्नीच्या नात्यातील प्राकृतिक, सांस्कृतिक संघर्षामागील वास्तव :

पती–पत्नीच्या नातेसंबंधाविषयी काही नैसर्गिक किंवा प्राकृतिक धारणा आहेत. या धारणा सर्व समाजाने मान्य केल्या आहेत. म्हणून या धारणा सर्वमान्य आहेत, आदर्श आहेत. या धारणा म्हणजे पती–पत्नीमधील संबंध निकोप असावेत. त्यांच्यामध्ये विश्वास असावा प्रत्येक सुखःदुःखात ते समान भागीदार असतात. पती–पत्नी या दोघांनी एकमेकांची सर्वप्रकारे काळजी घ्यावी. वाढत्या वयाबरोबर बदलणारे मन बदलणारी शरीरे यांचा स्वीकार करीत एकमेकांना समजावून घ्यावे. आपल्या मुलांच्या माध्यमातून पुढील पिढी उत्तम मुल्यांनी, गुणांनी युक्त व्हावी असा प्रयत्न करावा, वगैरे 'सुरवंट' कादंबरीमधील पती–पत्नीचे नाते कसे मांडले आहे ते पाहू या. त्याचप्रमाणे मांडलेला सांस्कृतिक संघर्षही तपासून पाहू या.

पती–पत्नी मधील शारीरिक संबंध निकोप, आनंददायी असावेत अशी भावना ही नैसर्गिक भावना आहे. चंदाच्या वाट्याला अशा प्रकारचे आनंददायी अनुभव आलेले दिसत नाही. या सर्व अनुभवांचे स्वरूप वेगळे आहे. ते

विचित्र आहे, हिडीस आणि ओंगळवावे आहे. ''सर्व काम आटोपून रात्रीचे दहा–अकराला चंदा आपल्या खोलीत येई तेव्हा ती दिवसभर मोलकरणीवाणी काम करून थकलेली असे. डोळ्यावर झोपेची हलकीशी तार आलेली असे. अन् त्या वेळेला आपल्याला झोपायचंय, एवढच तिच्या मनात असे. तेंव्हा मात्र श्रीनिवास तिला वेड्यागत करीत. त्या क्षणी ती निर्जीव शिळेप्रमाणे पडून राही. असेच प्रत्येक क्षणी इच्छा नसताना तिचे कितीतरी बलात्कार होत.''[6] पती–पत्नींच्या सहजीवनाचे हे रूप! याला सहजीवन तरी कसे म्हणावे? आपली पत्नी ही हाडामांसाची आहे, तिला भावभावना आहेत, ती घरासाठी घेत असलेले कष्ट या कशाचाही विचार न करता, तिच्या देहाचा उपभोग घेतला जातो. मनाच्या भावना, मनाच्या यातना ह्याचं काही विचार करावा असं का काही प्रकारच दिसत नाही. साऱ्या स्वप्नांची अशी डोळ्यादेखत होणारी हेळसांड अस्वस्थ करणारी आहे. भावनाचा कुठलाच ओलावा पतीच्या मनामध्ये नाही, त्यामुळे त्याला पाझर करणे किंवा त्याच्या डोक्यात पत्नीच्या सुखाच विचार येणे अशक्य आहे हे स्पष्ट होते.

या असल्या सहवासाविषयी चंदा म्हणते ''मनाविरुद्ध कसली साथ नसताना श्रीनिवास आपली पुरुषी हवस मिटवीत अन् तिला बाजूला लोटून देत की, पुन्हा प्रेमाने कुशीत सुद्धा घेत नसत कधी तर चंदा झोपेतून अचानक उठे तेंव्हा बघे की श्रीनिवास आपल्या शरीराशी काहीतरी घाणेरडं करीत आहे. तेंवहा तिला रडू येई अन् या साऱ्याची किळस वाटे अन् ती मांडीचा मुटका करून कितीतरी रडत बसे.''[7] शरीराच्या अशा विडंबनेविरुद्ध बोलणे, व्यक्त होणे अवघड गोष्ट आहे लेखिका अर्चना डावखर यांनी 'चंदा'च्या माध्यमातून या साऱ्या किळसवाण्या प्रकाशला वाचा फोडली आहे सुख देणारा पती नव्हं तर सुख ओरबडून घेणारा वा पती आहे. स्वतःच्या सुखापुढे त्याला इतर काहीही देणेघेणे नाही असे दिसते. या सुखापुढे तो जनावराच्या पातळीवर उतरलेला दिसतो.

या कादंबरीमध्ये असे प्रसंग आले आहेत, ते प्रसंग वर्णनातून उभे राहिले आहेत त्यामागे लेखिकेचे निरिक्षण, अनुभव आणि समाजाचे आकलन यांचा वाटा आहे. अत्यंत धाडसाने, परखपझो हे अनुभव त्यांनी मांडले आहेत.

### मौनातल्या स्त्रित्वाला मांडताना स्वीकारलेली वास्तवता :

स्त्रियांच्या मनातील...अंतरंगातील तडक, नाजुक भावना, स्त्री सुलभ लज्जा यांना नेमके पकडणे अवघड असते. प्रणयाविषयाच्या भावना, मनातल्या कल्पनाबद्ध अनुभव गोचर करणे, शब्दबद्ध करणे अवघड असते मात्र हे अनुभव त्यांनी वास्तवात न्याहाळता येतील. पाहता येतील एवढया स्पष्टपणे, संवेदनशीलतेने मांडले आहेत.

एके ठिकाणी लेखिका अर्चना–शिंदे चंदाच्या भावना व्यक्त करताना लिहितात– ''चंदाला कधी–कधी नकळत वाटून जाई, श्रीनिवासने अचानक यावं अन् हात पकडून जवळ घ्यावं. त्याचे ते हात कंबरेभोवती हळूवार फिरावेत. चंदाचं सारं शरीर तिनं श्रीनिवासच्या मिठीत सोडून दयावं. श्रीनिवासचे श्वास तिच्या रोमारोमात फिरावे. चंदाच्या ओल्या केसांचे पाणी सारीकडे दवासारखे पडावे, पसरावे.''[8] या भावना व्यक्त केल्या आहेत. इथे या भावना तरल आहेत, नैसर्गिक आहे. आपल्या स्त्रीत्वाचा सन्मान करीत प्रणयामध्ये रंगून जावे अशी चंदाची उत्कट इच्छा आहे. चंदाच्या या सर्व भावना लेखिकेने अलगदपणे टिपल्या आहेत.

''लैंगिक सुखाविषयी स्त्री लिहू लागली. पुरुषाच्या बरोबरीने तिने भाषिक स्वातंत्र्यही मिळवले. स्त्री ही सहनशील आहे या सत्याइतकेच तिलाही शारीरिक सुखाची अपेक्षा असते आणि केवळ आईइतकेच तिचे व स्त्रीत्व मर्यादित नसते याचा खुला उच्चार होऊ लागला.''[9] उच्चवर्णीय स्त्रिया, मध्यवर्गीय स्त्रिया, स्त्री–मुक्ती विषयी कार्य करणाऱ्या स्त्रिया आणि स्वतःच्या पायावर उभ्या असलेल्या म्हणजे आर्थिक दृष्टीने स्वावलंबी असणाऱ्या स्त्रियांना असे अनुभव थेटपणे मांडण्यासाठीची मोकळीक आहे, स्वातंत्र्य आहे. ही मोकळीक हे स्वातंत्र्य त्यांनी संघर्ष करून मिळविले आहे. मात्र शेतकरी कुटुंबातील, कुणबी परिवारातील, पाटील देशमुख घराण्यातील स्त्रियांविषयीचे या प्रकारचे अनुभव मांडणे धाडसाचे आहे. लेखिकेने हे धाडस दाखविले आहे. स्त्री शहरी असो की ग्रामीण, मुक्त असो की बंधनातील, तिच्या मनामध्ये निर्माण होणाऱ्या नैसर्गिक शरीर भावना ह्या वास्तव आहेत. त्या व्यक्त होणे हे सर्व पातळ्यांवर, सर्व स्त्रियांसाठी सारखे आहे हे स्पष्ट आहे.

### नव्या विचारांच्या स्त्रीचे नव्या विचारांनी जगण्याचे नवे वास्तव :

या कादंबरीची नायिका परंपरेने कितीही नाडली तरी, ती थांबणारी नाही. घराण्याच्या प्रतिष्ठेपायी केल्या जाणाऱ्या नियमांनी ती कितीही जखडली तरी ती सुटकेसाठी सतत प्रयत्न करणारी प्रयत्नवादी स्त्री आहे. ती दैववादी होत नाही. स्त्री असण्यामुळे हतबल होत नाही. ती संयमाने सर्व परिस्थिती हाताळते. येणारे दाहक अनुभव ती संयमाने पाहते, स्वीकारते. नैसर्गिक आघातांनी ती काहीकाळ भांबावते. मात्र आपल्या अपत्यासाठी ती

सावरते, कणखरपणे उभी राहते. आपल्या मुलीचीजडण–घडण करण्याच्या निर्धाराने ती पुन्हा उभी राहिलेली दिसते. अर्थात या प्रवासात तिच्या भावी जोडीदाराचे 'मानव'चे सहाय्य आहे, आधार आहे.

ती भूतकाळाला विसरण्याचा प्रयत्न करते. प्राणपणाने जीवनाशी लढत देते. कुटुंबाचा, अपत्यांचा भार एकटीच्या खांद्यावर आल्यानंतर स्त्रिया आईची आणि वडिलांची भूमिका ज्याप्रमाणे सक्षमतेने निभावतात, ती सक्षमता चंदा दाखवते. चंदाने हे स्वीकारलेले आहे की आता माहेर, माहेरची माणसे केंव्हाच मागे पडली आहेत. सासर आणि नवरा हे जगण्याचा खरा आधार नाहीत. 'मानव'मुळे तिला खऱ्या अर्थाने प्रेमभावनेत चिंब भिजून नवे जीवन जगण्याचा अनुभव मिळतो. मनातले सर्व संभ्रम ती दूर करते. जगण्यात वाट्याला येणारे प्रत्येक संघर्ष ती पाहते. स्वीकारते आणि या संघर्षाचा यशस्वी मुकाबलाही करते. नव्या विचारांचे, नव्या जगण्याचे स्वागत करताना जुनी माणसे, त्यांचे जुने आचार–विचार, जुन्या आठवणी हे सारे–सारे भिरकावून देते आणि नव्याने नव्या जीवनाचा डाव खेळते आणि जिंकूनही दाखवते.

या कादंबरीच्याविषयी आपले मत डॉ. श्रीपाक सबनिस, यांनी असे व्यक्त केले आहे. ''अर्चना शिंदे यांची कादंबरी वास्तवाच्या धगीतून स्त्री–जीवनाची व्यथा मांडते. मानवी भावनांचा गुंता समर्थपणे उलगडताना लेखिकेच्या लेखन कौशल्याचा कस लागतो. पण व्यक्तिरेखांचा कलात्मक अनुबंध स्वाभाविकतेच्या कसोटीवर कलात्मक उतरलाय, स्त्री–पुरुष संबंधातील वास्तवतेचा वेध घेण्याचा व पती–पत्नीच्या नात्यातील प्राकृतिक–सांस्कृतिक संघर्ष चितारण्याचे आव्हान अर्चना शिंदे या नव्या दमाच्या ग्रामीण लेखिकेने समर्थपणे पेलून नेले आहे. मौनातले बंधमुक्त करण्याचा लेखिकेचा प्रयत्न गौरवास्पद म्हटला पाहिजे.''[10] यामधून 'चंदा'च्या वास्तव प्रवासाची, यशाच्या प्रवासाची पावती मिळते. हे वास्तव अनुभव कादंबरीमधून व्यक्त झाले आहेत. वास्तवाच्या धगीतून ताऊन सूलाखून आलेले ते लेखन आहे.

या कादंबरीतील सांस्कृतिक संघर्षही वेगळेपणाने चित्रित झाला आहे. 'चंदा' ही कुणब्याची विधवा स्त्री आहे, तर मानव हा कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातीतील आहे. मात्र तो हळवा आहे. सुशिक्षित आहे, सुशिल आहे. चंदासारख्या संवेदनशील स्त्रीला जपण्याची, आधार देण्याची त्याच्याकडे मानसिक, वैचारिक ताकद आहे.दोघांमध्ये सहसंबंध विकसित होत जाणारे आहेत. चंदा आपल्या मनातील, स्वप्नातील आजवर न गवसलेले प्रेम आणि प्रेमिका शोधीत आहे. आपण घेत असलेला शोध हा फसव्या मृगजळाच्या शोधाचा प्रवास आहे, याची तिला जाणीव आहे. सगळ्याच सुरवंटांची फुलपाखरं होत नसतात हेही तिला मान्य आहे मात्र तिच्या स्वप्नाळू मन हे शोधणे थांबवत नाही.

मोठ्या मनाचा 'मानव' या दुःखी स्त्रीला सावरतो, आपले मानतो. तिच्यावर प्रेमपाचा भरभरुन वर्षाव करतो. या प्रेमामध्ये जातीपातीच्या भींती, संस्कृतीच्या भींती कोसळून पडतात. दोन संस्कृतींमधला अटळ संघर्ष या प्रेमापुढे क्षीण होतो. यासाऱ्या प्रवासातून, दाहकतेतून एक मोहक सुंदर सत्य आकारास येते. वास्तवात येते. लेखिकेने ते असे मांडले आहे. ''अचानक एक दिवस मानव पुन्हा चंदाच्या समोर येतो. अन् तिला लग्नाची मागणी घालतो. तेंव्हा तिच्याकडं सारं असतं. नोकरी, समाजात मानपान, एकटीला जगण्यात लागणारी हिंमत, पण मानवाची उणीव तिला या क्षणीही भासत होती...एक एक क्षण वाट पाहणारे....मानवाची वाट पाहणारे डोळे....अन् एके दिवशी ती पाहते. मानवकडे पाहते सारे देहभान विसरुन एकसारखी पहात राहाते. आपल्यासमोर मानव समक्ष उभा आहे! तिला विश्वासच बसत नाही...ती स्वतःला चिमटा घेऊन बघते की आपण स्वप्नात तर नाही ना!...जणू सारं आकाश तिच्या ओंजळीत आले होते. असंच केंव्हातरी एक दिवस मानव येईल तेंव्हा त्या क्षितिजापल्याड मला हात धरुन घेऊन जाईल. हे तिनं पाहिलेलं स्वप्न खंर झालं होतं. जणू तिच्या आयुष्यातले सारे क्षण सुरवंटांची फुलपाखरं झाली होती.''[11] अशाप्रकारे स्वप्नांचा प्रवास वास्तवाच्या दाहकतेकडे, आणि वास्तवाच्या दाहकतेतून तावून सुलाखून पुन्हा स्वप्ननगरीकडे होताना दिसतो.

स्त्री पुरुषांमधील नात्यांचे विविध कंगोरे यामधून व्यक्त झाले आहेत. अमानवी प्रेम, हृदय ओसंडून वाहणारे प्रेम, पतीचा विरह, पतीचे निधन, एकाकीपणा, जीवनाला पुन्हा नवी पालवी आणि पुन्हा नव्याने मिळालेले प्रेम. हा सारा प्रवास हा सुरवंट ते फुलपाखरू असाच आहे. सुरवंटाचे फुलपाखरू होताना सुरवंटाला यातना होतात. तशाच यातना कादंबरीमधल्या 'चंदा' च्या वाट्याला दिसतात. मात्र 'मानवा' सारख्या खरा माणूस आल्यामुळे दुःखाचे सारे घाव बुजून गेलेले दिसतात. या घावांच्या पुसरशा खुणाही शिल्लक राहिलेल्या दिसत नाहीत.

इथली संस्कृती स्त्रियांना वेगवेगळ्या बंधनांमध्ये बंदिस्त करण्याचा प्रयत्न करत आली आहे. हजारो स्त्रियांनी हे बंधनातले जगणे हेच खरे जगणे आहे. असा समज करुन घेतला म्हणून त्या बंधनातच जगल्या आणि संपल्या चंदासारख्या स्त्रियांनी परंपरा नाकाल्या. धाडसाने त्यांनी एकटीने जीवन प्रवास करण्याचे धाडस दाखविले

याच समाजातील स्त्रियांना पुन्हा लग्न करण्याचा अधिकारही नाकारला होता. आजही नाकारला आहे. या साऱ्या वास्तवाला 'चंदा' उघडे नागडे करताना दिसते.

'सुरवंट' कादंबरीमधून स्त्री–पुरुष संबंधातील हे विविध प्रकारचे अनुभव व्यक्त झाले आहेत. स्त्री विषयक धारणा कशा आहेत याचेही वास्वत चित्र या कादंबरीतून मांडले आहे हे वास्तव एकाचवेळी कडवट रूपातले आणि एकाच वेळी फुलपाखरासारखे सुंदर रूप घेणारे आहे.

## संदर्भ


1. डावखर–शिंदे अर्चना, सुरवंट (कादंबरी) यशोदीप पबिल्केशन्स पुणे प्रथमावृत्ती, 2016, पृ.7
2. डावखर–शिंदे अर्चना, उपरोक्त, पृ.59
3. ठाकूर रवींद्र, कादंबरी समाज शास्त्रीय समस्या दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 2007, पृ.64
4. सुरवंट, उपरोक्त, पृ.65 व 66
5. सुरवंट, उपरोक्त, पृ.91
6. सुरवंट, उपरोक्त, पृ.59
7. सुरवंट, उपरोक्त, पृ.60
8. सुरवंट, उपरोक्त, पृ.59
9. नीरजा, प्रा. पवार प्रज्ञा, प्रा. रूपवते प्रेमानंद, रुपवतेस्नेहजा(संपादक),(कुसुमांजली स्त्री कथा संमेलन विशेषांक 2007) प्रकाशक स्नेहजा रुपवते, पृ.69
10. सबनिस श्रीपाल, सुरवंट (मलपृष्ठ)
11. सुरवंट, उपरोक्त, पृ.263 व 264